ISSN 2321-9572

# सामाजिक अनुसंधान

त्रैमासिक- वर्ष १ले • अंक ४था • जून - सप्टेंबर -२०१४ • मूल्य १००रु.

*International Level Refered*



• संपादक •

कैलास गणपतराव कान्दि

Scanned by CamScanner

MAHMAR 42198/2013
ISSN 2321-9572

*International Registered & Recognized*
*Research Journal Related to Higher Education for all subjects*

# सामाजिक अनुसंधान

त्रैमासिक • वर्ष 1 ले • अंक 4 था • जून -सप्टेंबर-2014

संपादक : प्रा. कैलास कानिंदे

• कार्यकारी संपादक •

डॉ.सिध्दार्थ जाधव (बीड)

मनोज गिमेकर (भोकर)

• सहसंपादक •

डॉ.सुभाष पवार (अमरावती)

प्रा.भारत कल्याणकर (अमरावती)

प्रा.संदिप गोरे (वसमत)

प्रा.व्यंकट कोरेबोईनवाड (जालना)

प्रा. राहुल पंडित (जुन्नर)

प्रा.लक्ष्मण डोंगरे (हिमायतनगर)

प्रा.साईनाथ बनसोडे (औरंगाबाद)

प्रा. सुभाष रगडे (नांदेड)

सामाजिक अनुसंधान त्रैमासिक अंकातील लेखकांची/संशोधकाची मते ही त्यांची वैयक्तिक असून त्याबद्दल मुद्रक, मालक, प्रकाशक, संपादक मंडळ सहमत असतीलच असे नाही.

टिप - कॉपीराईट विषयी आलेल्या तक्रारी बाबत संबंधित लेखांचे संशोधक, लेखक जबाबदार असतील. मुद्रक,मालक, प्रकाशक, संपादक मंडळ जबाबदार राहणार नाहीत.

"सामाजिक अनुसंधान" हे त्रैमासिक मुद्रक मनोहर दिगांबर जोंधळे यांनी मालक, प्रकाशक, संपादक कैलास गणपतराव कानिंदे यांच्याकरीता रोहिणी प्रिंटींग प्रेस, वैशालीनगर, प्लॉट नं.19, तरोडा (बु.) नांदेड 431605 येथे छापून कार्यालय "मुक्ताई निवास", वनक्षेत्र कार्यालयाजवळ, समतानगर,भोकर ता.भोकर जि. नांदेड - 431801. येथे प्रकाशित केले.

Scanned by CamScanner

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | शोध निबंधाचे शीर्षक | संशोधकाचे नाव | पृ.क्रं. |
|---|---|---|---|
| १ | स्वतंत्र मजूर पक्षाची ऐतिहासिक पार्श्वभूमी. | प्रा. राहुल पंडित | १ |
| २ | शिवधर्म एक सामाजिक चळवळ | प्रा.तातेराव पवळे | ५ |
| ३ | भारताच्या अंतर्गत सुरक्षेसमोरील आव्हान : नक्षलवाद | डॉ. सुभाष के. पवार | १३ |
| ४ | सार्कचे शैक्षणिक कार्य | प्रा. भरत राठोड | १६ |
| ५ | शिक्षण प्रणालीतून मूल्यांचे संवर्धन व संक्रमण. | चित्ररेखा गोणारकर | २१ |
| ६ | १६ वी लोकसभा निवडणूक निकाल एक दृष्टिक्षेप | प्रा. नामदेव बाबुराव डोंगरे | २४ |
| ७ | शिवकालीन अर्थव्यवस्था : एक दृष्टिक्षेप | श्री. एस.एन. कसबे | २७ |
| ८ | स्त्रियांविरुध्दचे कुटुंबातर्गत हिंसाचार- एक अभ्यास | योगेश अंबुलगेकर ,<br>डॉ. डब्ल्यु.आर.मुज्जावर | ३१ |
| ९ | शेतकरी आत्महत्या : कारणे व उपाय | प्रा.फिसफिसे टी.आर. | ३४ |
| १० | मानवी हक्क आणि महिला विषयक दृष्टिकोन | **कानिंदे के.जी. , प्रा. पंडीत आर. बी.** | ४० |
| ११ | ग्रामीण समुदायाचे नागरी समुदायाकडे होणारे स्थलांतर- एक अभ्यास | योगेश अंबुलगेकर | ४३ |
| १२ | आदिवासींचा धर्म आणि धार्मिक पध्दतीचा अभ्यास | **प्रा.कानिंदे के.जी.** | ४७ |
| १३ | मराठी दलित साहित्यः एक अभ्यास | प्रा. व्यंकट दिगंबरराव कोरेबोईनवाड | ५० |


Scanned by CamScanner

# स्वतंत्र मजूर पक्षाची ऐतिहासिक पार्श्वभूमी.

प्रा. राहुल पंडित
श्री शिव छत्रपती महाविद्यालय, जुन्नर,जि. पुणे

**प्रस्तावना**

ज्यांच्याकडे सत्ता असते तेच स्वतंत्र असतात. स्वातंत्र्य प्राप्त करावयाचे असेल, सर्व प्रकारच्या दास्यातून मुक्त व्हावयाचे असेल तर सत्ता प्राप्त केली पाहिजे. सत्ता प्राप्त करावयाची तर राजकारण केले पाहिजे. कारण बिगर राजकीय प्रयत्नातून गवताचे पीक सुध्दा घेता येत नाही असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मत होते. राजकरणासाठी, सत्ता प्राप्त करण्यासाठी राजकीय पक्षाची आवश्यकता असते. पक्षाशिवाय राजकरण शक्य नाही. समाजात विविध वर्ग असतात आणि त्यांचे वर्गीय हित संबंध असतात. त्यांच्या वर्गीय हित संबंधानुसार ते आपआपल्या वर्गीय पक्ष संघटनात संघटीत होवून त्यातून आपले हित-संबंध साध्य करण्याचा, सत्ता प्राप्त करण्याचा प्रयत्न करतात.

भांडवलदार, जमीनदार, वर्गीय लोक आपल्या हितसंबंधाबाबत जागरूक असतात. त्यामुळे ते लवकर संघटित होतात आणि सत्ता प्राप्त करतात. याउलट दलित, आदिवासी, भटके, विमुक्त, कामगार, शेतकरी, स्त्रिया इत्यादी कष्टकरी वर्गातील ८० टक्के लोक आपल्या वर्गीय हितसंबंधाबाबत शिक्षणाअभावी जागरूक नसतात. त्यामुळे ते पक्षसंघटना म्हणून लवकर संघटित होत नाही. त्यांच्या राजकीय जाणीव जागृतीच्या अभावी भांडवलदार, जमीनदारवर्गातील शासक, शोषक वर्गातील मुठभर २० टक्के लोक ८० टक्के शोषित वर्गावर राज्य करतात, त्यांचे शोषण करतात असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मत होते. ८० टक्के शोषित लोकांना २० टक्के असलेल्या शोषक वर्गाच्या दास्यातून मुक्त करण्यासाठी, त्यांना राज्यकर्ता वर्ग बनविण्यासाठी त्यांचे शिक्षण, संघटन, संघर्ष संघटित करणे आवश्यक असल्याचे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या अध्ययन चिंतनातून आणि जीवन अनुभवातून ठोस स्वरूपात जाणले होते. तसेच ब्राम्हणशाही आणि भांडवलशाही हे दलित, श्रमिक वर्गाचे दोन मुख्य शत्रु आहेत असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मत होते. ब्राम्हणशाही, भांडवलशाही नष्ट केल्याशिवाय दलित, कष्टकऱ्यांना दास्यमुक्ती मिळणार नाही. ब्राम्हणशाही म्हणजे जातीवर्ण व्यवस्था ब्राम्हणवादी संस्कृती नष्ट केल्याशिवाय आणि सरंजामशाही, भांडवलशाही नष्ट केल्याशिवाय दलित, शेतकरी, कामगार वर्गाचे राज्य, सत्ता प्रस्थापित करता येणार नाही, म्हणून सर्व कष्टकरी वर्गांना सर्वाधिक शोषित असलेल्या दलितांच्या नेतृत्वाखाली वर्गीय पक्ष संघटनेत संघटित करणे आणि या वर्गाच्या शुध्द वर्गीय हितसंबंधांवर आधारीत पक्ष संघटनेची स्थापना करणे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आवश्यक वाटत होते. त्यांनी सामाजिक विषमतेविरूध्द उभ्या केलेल्या संघर्षाच्या अनुभवातून याची तीव्र जाणीव झाली होती असे दिसून येते. १९२० ते १९३५ पर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी गुलामापेक्षा भयंकर दास्याचे जीवन जगणाऱ्या अस्पृश्य जातीवर्गाच्या दास्यमुक्तीसाठी कार्य केले. त्यानंतर त्यांनी विविध क्षेत्रात काम करणाऱ्या कामगार वर्गाकडे लक्ष दिले. दलित जाती वर्गासह, दलित कामगार वर्गासह इतर कामगार आणि शेतकरी यांच्या हितसंबंधासाठी, त्यांच्या दास्यमुक्तीसाठी त्यांनी १५ ऑगस्ट १९३६ रोजी ''स्वतंत्र मजूर पक्षाची'' स्थापना केली.

१९३६ मध्ये स्थापन झालेल्या स्वतंत्र मजूर पक्षाने काही महिन्यातच जाहीर झालेल्या १९३७ च्या मुंबई,मध्यप्रदेश प्रांताच्या कायदे मंडळाच्या निवडणूकीत भरघोष यश मिळवून, १९३६ ते १९४२ या सहा वर्षाच्या काळात स्वतंत्र मजूर पक्षाने जे ऐतिहासिक कार्य केले ते वर्तमान आंबेडकरवादी पक्ष संघटनांना आणि साम्यवादी पक्ष संघटनांना अत्यंत मार्गदर्शक ठरणारे आहे. भारतातील भेदभावावर आधारलेल्या जाती व्यवस्थेमुळे येथील कामगार, कष्टकरी घटकांनी जातीचे निर्बंध तोडून कामगार, कष्टकरी वर्ग म्हणून एकत्र यावे. आपला वर्गीय राजकीय पक्ष स्थापन करून आपले हितसंबंध साध्य करावे अशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची इच्छा होती. याच जाणीवेने त्यांनी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली. स्वतंत्र मजूर पक्षाच्या लालझेंडयाखाली हे सर्व दलित शोषित वर्ग एकत्रित येवून जात धर्म विसरून कामाला लागले. देशातील दलित, शेतकरी, कामगार जेव्हा स्वतंत्र होतील तेव्हाच खऱ्या अर्थाने देश स्वतंत्र झाला असे म्हणता येईल. शेठ सावकरांचे स्वातंत्र्य म्हणजे देशाचे स्वातंत्र्य नाही. येथील



Scanned by CamScanner

जातीव्यवस्थेचे विषमतेचे भूत, धार्मिक विषमतेचे भूत गाडून टाकल्याशिवाय स्वातंत्र्याचा लढाही जोमाने लढविता येणार नाही आणि कामगार, शेतकरी, कष्टकरी वर्गाचे समाज सत्तावादी राज्यही त्याशिवाय प्रस्थापित करता येणार नाही असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे ठाम मत होते. सामाजिक आणि आर्थिक विषमतेविरुध्द श्रमजीवी वर्गाचा लढा उभारला पाहिजे. भारतातील डावे समाजवादी पक्ष कष्टकरी वर्गाचे आर्थिक प्रश्न घेवून लढतात. परंतु ते सामाजिक विषमतेचे प्रश्न गंभीरपणे घेत नाही. त्यामुळे त्यांच्या चळवळीला मर्यादा पडतात असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात.स्वतंत्र मजूर पक्षाची ध्येय धोरणे, कार्यक्रम आणि जाहिरनामा तसेच त्यांचे राजकीय तत्वज्ञान आणि प्रत्यक्ष कृतीकार्यक्रम यामध्ये दलित, श्रमिक,शेतकऱ्यांच्या दास्यमुक्तीचा क्रांतीकारक ध्येयवाद असल्याचे दिसून येते.राजकारण हे वर्गीय जाणीवेवर आधारीत असले पाहिजे. वर्गीय जाणीवेशिवायचे राजकारण म्हणजे निव्वळ ढोंग होय. कष्टकरी वर्गातील लोकांनी कष्टकरी वर्गाच्या वर्गीय जाणीवेवर आधारीत असलेल्या पक्षातच सामिल झाले पाहिजे,आणि आपला स्वतंत्र मजूर पक्ष शुध्द वर्गीय जाणीवेवर आधारीत असलेला पक्ष असल्यामुळे तुम्ही या पक्षातच सामिल झाले पाहिजे. भांडवलदार, जमिनदार वर्गाच्या पक्षात सामिल होता कामा नये असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात.

१९३६ मध्ये प्रत्यक्ष स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना होण्यापूर्वीच्या भारतातील राजकीय पक्ष संघटनावर दृष्टीक्षेप टाकला तर असे दिसून येते की,कॉंग्रेस पक्ष विविध गटात विभक्त होता. मुस्लीम लीग, हिंदू महासभा,कम्युनिस्ट पक्ष, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि कॉंग्रेस अंतर्गत स्थापन झालेला समाजवादी पक्ष इत्यादी प्रमुख पक्ष अस्तित्वात होते. म्हणजे भारतीय राजकारणात एकीकडे वर्ग आणि जातीच्या समन्वयाची धोरणे असलेले कॉंग्रेस, दुसरीकडे मुस्लीम लीग, हिंदू महासभा, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हे जातीय हित संबंधाना वाहून घेतलेले पक्ष आणि तिसरीकडून कम्युनिस्ट व समाजवादी पक्ष हे शुध्द वर्गीय भूमिका घेणारे राजकीय पक्ष होते. अशी ढोबळ मानाने या पक्षाची वर्गवारी करता येते. अशा परिस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर नवा पक्ष का स्थापन करत होते ? त्यांची ब्रिटीश साम्राज्याशाही, राष्ट्रीय कॉंग्रेस, जातीय पक्ष संघटना आणि कम्युनिस्ट पक्ष याबद्दल काय भूमिका होती ? तसेच या सर्व पक्षापेक्षा स्वतंत्र मजूर पक्षाचे वेगळेपण काय होते. आज आंबेडकरी म्हणवून घेणारे राजकीय पक्ष, नेते, कार्यकर्ते, विचारवंत हे बाबासाहेबांना अपेक्षित स्वरुपात पक्ष संघटनांना चालवितात का ? त्यांचा विचार, व्यवहार बाबासाहेबांच्या विचारावर आधारीत आहे का ? याचा विचार करणे आवश्यक ठरते. साम्राज्यशाही, भांडवलशाही विरोधी लढतांना ब्राम्हणशाही विरुध्द लढणे हे तितकेच आवश्यक असते असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मत होते. स्वतंत्र मजूर पक्षाची ध्येय धोरणे, उद्दिष्टे ही सर्व दलित, शेतकरी, कामगार वर्गाच्या हितसंबंधाची संबंधित असल्याचे दिसून येते. हा पक्ष एक क्रांतीकारक पक्ष होता.भारतातील आंबेडकरानंतरचे साम्यवादी, समाजवादी म्हणून घेणारे पक्ष आणि आंबेडकरवादी म्हणून घेणाऱ्या पक्ष संघटना यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्व आणि व्यवहाराची त्यांच्या राजकीय दृष्टिकोनाची आवश्यक ती दखल घेतली नाही. डाव्या समाजवादी, साम्यवादी आणि आंबेडकरवादी पक्ष संघटनांचे राजकारण धोक्यात आले असतांनाही आपल्या चुका सुधारण्याचा ते प्रयत्न करतांना दिसत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा स्वतंत्र मजूर पक्ष आणि या पक्षाची ध्येय धोरणे, उद्दिष्टे आजही आंबेडकरी, समाजवादी, साम्यवादी पक्षांना मार्गदर्शक ठरु शकतात. आपल्या मर्यादावर मात करण्यासाठी उपयुक्त ठरु शकतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे दूरदृष्टी विचारांचे असल्यामुळे सामान्य माणसाला केंद्रबिंदू मानून भारतीय संविधानाच्या माध्यमातून येथील गरिबातील गरीब माणसाला न्याय कसा देता येईल, तो आपल्या न्यायहक्कापासून कसा वंचित राहणार नाही, याची काळजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घेतली असून तशी तरतूद घटनेच्या सरनाम्यात केलेली आपणाला दिसते. त्यामुळे प्रत्येक भारतीय नागरिकास एक मूल्य एक मत, व्यक्ती स्वातंत्र्य, प्रत्येकाने आपापल्या धर्माप्रमाणे वागण्याचे स्वातंत्र्य, भारतात कोठेही विस्थापित होण्याचे स्वातंत्र्य,विचारांचे स्वातंत्र्य, याशिवाय समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय हे घटनात्मकअधिकार बहाल केलेले आहेत. याचे सर्वश्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या क्रांतीकारी व दूरदृष्टी असणाऱ्या विचारांना दयावे लागते.शेकडो वर्षे फक्त चूल आणि मूल अशी संकुचित आयुष्य कंठणारीभारतीय स्त्री केवळ डॉ. बाबासाहेबांच्या पुण्याईने स्वातंत्र्याची गोडी चाखू लागली.प्रगतीची,



Scanned by CamScanner

यशाची अनेक क्षेत्र पादाक्रांत करू लागली. राजकारणात, सत्तेततेहत्तीस (३३) टक्केची वाटेकरी झाली, मोठी पुढारी झाली,साक्षातराष्ट्रविद्यात्याच्या योगदानालाच आव्हान देऊ लागली. गेली ६३ वर्षे डॉ. बाबासाहेबांच्या विचारांच्या शक्तीमुळे हा देश एकसंघ राहिला परंतु आताजागतिकिकरणाच्या आक्रमणामुळे केवळ सत्ता आणि पैसा महत्वाचा होऊ पहातआहे. या सर्व संकटातून आपणाला केवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे तत्वज्ञानआणि विचारच वाचवू शकतात.

**१.२ संशोधनाचे महत्व**

एकीकडे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नंतर कार्यरत असलेल्या आंबेडकरी पक्ष संघटना सामाजिक विषमतेला, ब्राम्हणशाहीला केवळ औपचारिक विरोध करतात आणि भांडवलशाही, सरंजामशाहीच्या विरूध्दतर काहीच बोलत नाहीत म्हणजे वर्ग अंताबद्दल काहीच बोलत नाही. याच बरोबर जातीय हितसंबंधापलीकडे जावून जातीअंतासाठी संघर्ष करण्याकडे त्यांनी पूर्णपणे दुर्लक्ष केलेले दिसते. दुसरीकडे डावे समाजवादी पक्ष भांडवलशाही विरूध्द बोलत असले तरी ते ब्राम्हणशाही विरूध्द जातीव्यवस्थे विरूध्दचा लढा गंभीरपणे घेतांना दिसत नाहीत. त्यामुळे डाव्या पक्ष संघटना आणि आंबेडकरी पक्ष संघटना दलित, श्रमिक, शेतकरी, कष्टकरी वर्गाच्या दास्यमुक्तीचा सर्वकष संघर्ष उभा करू शकल्या नाहीत. या कष्टकरी वर्गाच्या दास्यमुक्तीचा लोकलढा उभारण्यासाठी डाव्या पक्ष संघटनांना आणि आंबेडकरी पक्ष संघटनांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा स्वतंत्र मजूर पक्ष आज ही निर्विवादपणे आपल्या मर्यादावर मात करण्यासाठी मार्गदर्शक ठरू शकतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांना त्यांच्या राजकीय, सामाजिक कार्याला केवळ दलितांच्या हित संबंधाबाबत संकुचित करून पाहिले जाते. बहुसंख्य आंबेडकरवादी अभ्यासकाने त्यांचे विचार आणि कार्य दलितापुरते मर्यादित होते. अशा स्वरूपातच चित्रण केले आहे. स्वतंत्र मजूर पक्षाच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उभारलेला लोकलढा हा त्यांच्या नेतृत्वातील अत्यंत गतीमान, संघर्षशील आणि क्रांतीकारक स्वरूपाचा होता असे दिसून येते आणि तो वर्तमान डाव्या व आंबेडकरी पक्ष संघटना करीता मार्गदर्शक ठरू शकतो. हे या विषयाचे महत्व आहे.

**उद्दिष्टे -**

प्रस्तुत शोध प्रबंधात विषयाच्या अनुषंगाने खालील उद्दिष्टे निश्चित करण्यात आले आहे.

१. स्वतंत्र मजूर पक्षाचे ध्येय, धोरणे, उद्दिष्टे, कार्यक्रम आणि विचारसरणी अधोरेखित करणे.

२. स्वतंत्र मजूर पक्षाचे वर्तमान काळात असलेले महत्व अधोरेखित करणे.

३. या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा दलित, शेतकरी, कामगार, स्त्रिया आदी कष्टकरी वर्गाच्या दास्यमुक्तीचा व्यापक वर्गीय दृष्टिकोन अधोरेखित करणे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना केवळ दलितांचे कैवारी म्हणून संकुचित करणाऱ्या प्रवृत्तीचे खंडन करणे.

४. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वातील स्वतंत्र मजूर पक्ष एक स्वतंत्र वर्गीय क्रांतीकारक चळवळ होती हे अधोरेखित करणे.

५. स्वतंत्र मजूर पक्षाच्या ध्येय, धोरणे, कार्यक्रमाचे, राजकीय विचारसरणीचे वर्तमान काळातील कामगार, शेतकरी, कष्टकरी वर्गाच्या चळवळीकरीता मार्गदर्शक तत्वे म्हणून अधोरेखित करणे.

**अध्ययन पध्दती -**

संशोधनाचे अनुमान, निष्कर्ष तंतोतंत येण्यासाठी अध्ययन पध्दतीच्या सजग वापराची आवश्यकता असते. योग्य संशोधन पध्दती यशस्वी संशोधनासाठी पायाभूत ठरू शकते. अचूक निष्कर्षाच्या जवळपास पोहचण्यासाठी प्रभावी माध्यम म्हणून संशोधन पध्दतीकडे पाहणे संयुक्तीक ठरेल. प्रस्तुत संशोधन विषयाच्या आवश्यकतेनुसार योग्य संशोधन पध्दतीचा अवलंब केला जाईल.

सदरील संशोधन प्राथमिक व दुय्यम माहितीवर आधारलेले असेल.

१.प्राथमिक माहिती -

अ. स्वतंत्र मजूर पक्षाच्या संदर्भात त्याची घटना, कार्यक्रम, जाहिरनामा आणि इतर कार्य या संदर्भात मूळ दस्ताऐवजातून माहिती मिळवणे.

ब. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वेळोवेळी या पक्षासंबंधी केलेली वैचारिक मांडणी यातून त्या पक्षाची विचारसरणी समजून घेणे.

२. व्दितीय माहिती -

अ. स्वतंत्र मजूर पक्षाविषयी आणि त्याच्या एकूण कार्याविषयी विविध विचारवंतानी केलेली मांडणी मूळ साहित्याच्या संदर्भाने पडताळून वस्तुनिष्ठ माहिती मिळविणे.



Scanned by CamScanner

ब. विविध वृत्त पत्रातून, मासिकातून विविध भाष्यकारांच्या लेखनातून या पायऱ्या विषयीचे पुरावे शोधणे.

**गृहितके -**

प्रस्तूत संशोधनाच्या अध्ययनासाठी पुढील गृहितके निश्चित करण्यात आली आहेत.

१. स्वतंत्र मजूर पक्षाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्वतंत्र वर्गीय दृष्टिकोनाचे क्रांतीकारक अधिष्ठान राहिले आहे.

२. ब्राम्हणशाही, भांडवलशाही, संरजामशाही नष्ट करून कष्टकरी वर्गाची सत्ता प्रस्थापित करणे हे स्वतंत्र मजूर पक्षाचे ध्येय होते.

३. शेतीचे, मुलभूत उदयोगांचे, राष्ट्रीयकरण करून समाज सत्तावादी भारताची निर्मिती करणे हे स्वतंत्र मजूर पक्षाचे ध्येय होते.

४. जातीविहीन, वर्गविहीन, विषमता विरहित शोषण मकुत भारताची निर्मिती करणे हे या पक्षाचे ध्येय होते.

५. सर्व कष्टकरी वर्गांना वर्गीय पातळीवर एकत्र आणण्याचा आदर्श या पक्षाने घालून दिला.

६. जात, धर्म विरहित वर्गीय पक्षाच्या माध्यमातूनच सर्व कष्टकरी वर्गाची दास्यमुक्ती शक्य आहे याची जाणीव करून दिली.

७. सर्व कष्टकरी वर्गांना वर्ग म्हणून एका पक्षात संघटीत होवूनच दास्यातून शोषणातून मुक्त होता येईल. याशिवाय दुसरा पर्याय नाही, याची शिकवण स्वतंत्र मजूर पक्षाच्या लढयातून मिळते.

**संदर्भाचा मागोवा -**

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकर असे म्हणतात, ''राजकारणात शिरणे म्हणजे राजकीय पक्ष निर्माण करणे होय. राजकीय पक्षाशिवाय राजकारण निरूपयोगी ठरते....''

२. ''जर समाजवाद हे उद्दिष्टे असेल तर तो आणण्याचा मार्ग म्हणजे लोकांना समाजवाद शिकवणे आणि त्यासाठी संघटित करणे सर्व वर्गांना विनंत्या करून समाजवाद येणार नाही.'' - डॉ. बाबासाहेब आंबेडकर.

३. ''राजकारण हे वर्गीय जाणीवेवरच उभे असले पाहिजे. वर्गीय जाणिवेशिवाय असणारे राजकारण ही शुध्द भोंदुगिरी आहे आणि मला माहित असलेला शुध्द वर्गीय जाणीवेवर असलेला पक्ष म्हणजे स्वतंत्र मजूर पक्ष होय.'' - डॉ. बाबासाहेब आंबेडकर.

४. ''ब्राम्हणशाही आणि भांडवलशाही हे कामगार वर्गाचे दोन मुख्य शत्रू होत.'' - डॉ. बाबासाहेब आंबेडकर.

वरील संदर्भातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा स्वतंत्र मजूर पक्ष हा क्रांतीकारक, कष्टकरी वर्गाच्या जाणिवेवर आधारित असलेला आणि दलित, श्रमिक, शेतकरी वर्गाच्या दास्य मुक्तीचा क्रांतीकारक ध्येयवाद स्विकारलेला पक्ष होता हे अभिव्यक्त होते.

**संदर्भ सूची.**

१.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे लेखन आणि भाषणे - खंड - १८, संपादक मंडळ, वसंत मुन, हरी नरके, प्रा. अशोक गोडघाटे, डॉ. म.ल. कासारे, एन.जी. कांबळे. - डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती उच्च आणि तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन २००२

२.डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरवग्रंथ - संपादक मंडळ - दया पवार (निमंत्रक), प्रा. केशव मेश्राम, प्रा. बा.ह. कल्याणकर, वामन निंबाळकर, डॉ. एस.एस. भोसले, अर्जुन डांगळे, हरी नरके, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

३.डॉ. भिमराव रामजी आंबेडकर - खंड - ७, चांगदेव वामनराव खैरमोडे, सुगावा प्रकाशन पुणे १९८४.

४.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची समग्र भाषणे - खंड - २ संपादक - प्रदिप गायकवाड, क्षितीज पब्लीकेशन नागपूर.



Scanned by CamScanner